17-18 (11)





MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Issue-20, Vol-01, Oct. to Dec.2017


# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal




Editor
Dr.Bapu G. Gholap

# Index

1) Cyber Terrorism: The New Face of Terror
Ruchika Chaudhary, B.H.U, Varanasi (U.P) India. || 10

2) E GOVERNANCE IN BRUHAT BANGALORE MAHANAGARA PALIKE
Prof. Sujatha Das Gupta, Prof. Dr. Y. Gangadhara Reddy, Bangalore || 16

3) Technical Knitted Garments Production On the Computerized Knitting Software's
Pradeep Mandal, Dr. Bhavana Sharma, Jabalpur || 21

4) Study of the Growth of Different Sectors in India: A Comparison of Pre and Post Reform Period
Divya Budhia Gupta, Jalandhar || 24

5) भारत–जापान संबंध चुनौतियाँ एवं संभावनाएँ
Asst. Prof. Ashok L. Kolambikar, Purna, Dr. Anil N. Chikate, Jalgaon || 30

6) मुक्तिबोध के काव्य में बिम्ब योजना
प्रा. डॉ. रामकृष्ण बदने, वसन्तनगर || 40

7) जागतिकीकरण आणि उत्तम कांबळे यांची कविता
डॉ. दिलीप पी. पवार, नाशिक || 42

8) साहित्य का शैक्षिक परिप्रेक्ष्य
संजीव कुमार भारद्वाज, दिल्ली || 46

9) "कक्षा–५ के विद्यार्थियों में ई–लर्निंग के प्रति अभिवृत्ति का अध्ययन"
डॉ० कल्पना वर्माए लखनऊ, सीमा चौधरीए लखनऊ || 51

10) विनोबाजी के दर्शन में ज्ञान का अर्थ
डॉ. भूपेन्द्र एम गजेरा, वल्लभ विद्यानगर || 57

11) आदिवासी विमर्श - 'मरंग गोडा निलकंठ हुआ' के संदर्भ में
प्रा.डॉ.विजय घुगे,जि.जलगांव || 60

12) नारी विमर्श - 'कुफ्र' के संदर्भ में
प्रा.डॉ.विजय घुगे, पारोला,जि.जलगांव || 62

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

13) 'चित्रा मुद्गल और नारी विमर्श'
डॉ. श्रीदेवी चौबे.जिला–धमतरी, थानेश्वर गिरी.रायपुर(छ.ग.) || 64

14) भारतीय लोकतंत्र और धर्मनिरपेक्षता
डॉ.पी.पी.गिरणीवाले, मेहकर . जि.बुलडाणा. || 67

15) महिला उत्पीड़न की प्रकशति का एक समाजशास्त्रीय अध्ययन
डॉ सुरजीत कौर, डॉ सुरजीत कौर || 70

16) ध्यान : एक शैक्षिक मनोवैज्ञानिक विश्लेषण
डॉ० बुद्धि प्रकाश कोटनाला, वाया––डुण्डा जनपद–टिहरी गढ़वाल || 74

17) वाल्मीकि की दशष्टि में नारी की उपादेयता
कु. ममता महेरा, देहरादून || 80

18) महिला उघमिता और भारत
डॉ. अंजना ठाकुर, महा. राजनांदगांव––दुर्गा प्रसाद गुप्ता, जबलपुर (म०प्र०) || 82

19) दिव्यांग बालकों को समाज द्वारा बहिष्कार करने पर उनकी मनोस्थिति का वर्णन
अंतिमबाला पाण्डेय, उषा कटियार उज्जेन || 85

20) महाकवि बाणभट्ट का यायावर्य
डॉ. कृष्णमोहन पाण्डेय, डोहगी ऊना हि.प्र. || 90

21) सितार की उत्पत्ति का आधार––वीणा
समोश कुमार, ऊधमपुर (जम्मू––कश्मीर) || 96

22) भीष्म साहनी के उपन्यास 'बसंती' में देशकाल व वातावरण
सय्यद उस्मान अमीरसाहब, मुखेड || 98

23) हिन्दी नवगीतों का आधुनिक संदर्भ
डॉ.मोहम्मद अजहर ढेरीवाला || 100

24) सूचना प्रौद्योगिकी के विकास से उत्पन्न दुष्परिणामों का जैन योग द्वारा निवारण
डॉ० प्रवीण कुमार गुप्त, पैकौली (हाटा) कुशीनगर (उ०प्र०)। || 105

25) यशपाल के उपन्यास 'दिव्या' में सामाजिक यथार्थ
— डॉ. मधु ओझा, एम.एम. (हिन्दी), पीएच.डी. कोलकाता। || 108

www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com

26) ''अपरवेदा सिंचाई परियोजना से कशषि उत्पादकता एवं भूमि उपयोग में परिवर्तन''
डॉ. बी.एल. पाटीदार.निवांड़ी, कैलाश यादव.खरगोन || 111

27) अदम गोंडवी की कविता में जनवादी चेतना
प्रा.डॉ.महेंद्रकुमार रामचंद्र वाढे, धुले. || 118

28) गांधीजी राजनीतिज्ञ या राष्ट्रभक्त ?
डॉ. अजय शंकर यादव, झाँसी, उ.प्र || 121

29) छत्तीसगढ़ राज्य में महिला पुलिस थानों की भूमिका का प्रशासनिक अध्ययन
डॉ. प्रमोद यादव, नुसरत जहाँए दुर्ग (छ.ग.) || 123

30) आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी के साहित्य में सांस्कृतिक चेतना
प्रा. पटेलिया तेजाभाई एन. राजेन्द्रनगर, जि. साबरकांठा || 127

31) कवि रसखान और उनकी कृष्ण भक्ति
डॉ. नजमा एम. अंसारी कालावड, जि. जामनगर || 131

32) सूर्यबाला की कहानियों में चित्रित परंपरावादी नारी
डॉ. गेलजी भाटिया रांधेजा, || 134

33) उषा राजे सक्सेना की कहानियों में सामाजिक मूल्य
डॉ. बाबूलाल वी. मारू बोटाद (गुजरात) || 138

34) हिन्दी उपन्यासों में विस्थापन और श्रमिक जीवन
- डॉ. जादव जगमालभाई आर. बगसरा || 141

35) धमत्र और विज्ञान
डॉ. रमेशचन्द्र मुरारी फतेपुरा दाहोद || 146

36) जयशंकर प्रसाद के उपन्यासों में पारिवारिक जीवन
- डॉ. जादव जगमालभाई आर. बगसरा || 152

37) आयुर्वेद और धर्मशास्त्र
प्रा. रामसिंह एन डोडिया कोडीनार, जि. गिर सोमनाथ || 155

38) प्रेस की विधायीका कार्यपालीका और न्यायपालीकासे संबंध : एक विश्लेषण
प्रा. लक्ष्मण एफ. शिराळे, विदर्भ महाविद्यालय, बुलडाणा || 160

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

39) भारतीय राजनीति की दिशा एवं दशा का एक अध्ययन
डॉ.आयशा अहमद, डॉ.प्रमोद यादव || 162

40) धुळे शहरातील बाल मजुरांच्या समस्या
प्राचार्य , डॉ. यादव हरी सनेर || 166

41) भारतीय ऐतिहासिक एवं वर्तमान परिदृश्य में पंचायत में महिला प्रतिनिधित्व
डॉ० नीशू कुमार, लण्ढौरा, हरिद्वार || 169

42) शासकीय एवं अशासकीय उच्चतर माध्यमिक विद्यालयों के छात्र–छात्राओं की सामाजिक....
आस्था जौहरी एवं डॉ. अशोक शर्मा, ग्वालियर (म.प्र.) || 177

43) रस सिद्धान्त : एक विहंगम दृष्टि
श्रीमती बिन्दु देवी, सिरसा (हरि.) || 180

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
हर्षवर्धन पब्लिकेशन प्रा.लि.
मु.पो.लिंबागणेश, ता.जि.बीड पिन : ४३११२६ (महाराष्ट्र)
harshwardhanpubli@gamil.com, vaidyawarta@gmail.com
सर्व प्रकारच्या शैक्षणिक व संदर्भ ग्रंथाचे प्रकाशक आणि वितरक

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

बिम्बों के समस्त प्रकारों को मुक्तिबोध की कविताओं मे देखा जा सकता हैं। ब्रम्हराक्षस यह मुक्तिबोध का सर्वधिक प्रिय बिम्ब है।

शमशेहर बहादुर सिंह ने मुक्तिबोध की बिम्बों की विशेषता के बारे में 'चाँद का मुँह टेढ़ा हैं' की भूमिका में लिखा है —'' मुक्तिबोध की हर इमेज के पीछे शक्ति होती है, वे हर वर्णन को दमदार, अर्थपूर्ण और चित्रमय बनाते हैं।''[१०] इस प्रकार मुक्तिबोध के काव्य बिम्ब योजना को देखा जा सकता हैं।

संदर्भ :—


०१. आधुनिक हिन्दी कविता में बिम्ब विधान का विकास—डॉ. केदारनाथ सिंह दिल्ली १९७१—पश. क्र.०२
०२. काव्य बिम्ब—नेषनल पब्लिषिंग हाउस,दिल्ली १९६७—पश.क्र.०५
०३. चाँद का मुँह टेढ़ा है—पृ.क्र.११—१२
०४. तारसप्तक—पृ.क्र.—४४
०५. चाँद का मुँह टेढ़ा हैं—पृ.क्र.११—१२
०६. चाँद का मुँह टेढ़ा है — पृ.क्र.—६६
०७. चाँद का मुँह टेढ़ा है —पृ.क्र. २३१
०८. चाँद का मुँह टेढ़ा है —पृ.क्र. २५
०९. समकालीन प्रतिनिधि कवि : अनन्त किर्ति निवासी —पृ.क्र.५२
१०. चाँद का मुँह टेढ़ा है — भूमिका पृ.क्र.— २५


**07**

# जागतिकीकरण आणि उत्तम कांबळे यांची कविता


**डॉ. दिलीप पी. पवार**
विभागप्रमुख, मराठी विभाग,
के.टी.एच.एम.महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक


**********

**प्रस्तावना :-**

'जागतिकीकरणात माझी कविता' हा कवी उत्तम कांबळे यांचा २००६ साली प्रकाशित झालेला पहिला काव्यसंग्रह. कांबळे यांनी आपल्या लेखनातून सामाजिक, राजकीय दांभिकतेवर बोट ठेवलेले आहे. स्पष्ट आणि चोख विचार त्यांच्या एकूण लेखनाचा पाया आहे. असाच वैचारिक सूर त्यांच्या कवितांत भरून राहिलेला आहे. जागतिकीकरणाबाबत प्रबोधन करणाऱ्या या कवीने प्रतीकांच्या माध्यमातून जागतिकीकरणाचा मानवी समूहांवर होत असलेल्या परिणामांचा वेध घेण्याचा प्रयत्न आपल्या कवितांमधून केलेला आहे. या संग्रहातील 'जागतिकीकरणात माझी कविता' ही लांबीनेच नव्हे, तर आशयाने देखील अत्यंत सशक्त असलेली कविता. या सतरा खंडातील कवितेत ते जागतिकीकरणाच्या फेऱ्यात अडकलेल्या, भरडल्या जाणाऱ्या अनेक विषयांचा परामर्श घेतात. जागतिकीकरणाच्या अनुषंगाने सदर लेखात त्यांच्या या व इतर काही कवितांबद्दल विवेचन करणार आहे. 'जाखाऊ' हा आजच्या काळातील कळीचा मुद्दा आहे. त्याचा विधायक वापर जर झाला नाही तर माणूस विविध प्रकारे भरडला जातो. आज जागतिकीकरणाने प्रत्यक्षपणे आणि अप्रत्यक्षपणे मानवाच्या मूलभूत अधिकारांना, सामाजिक न्याय, करुणा, मैत्री आदी जीवनमूल्यांना कसे निकाली काढले आहे, समाजाच्या सर्वच स्तरातील जीवन कसे भरडले गेले आहे, त्याच्या प्रभावामुळे वरवर गोंडस रूप मिरवणाऱ्या समाजाच्या आतल्या जखमा किती चिघळलेल्या, रक्ताळलेल्या आहेत या सर्व वास्तवावर 'क्ष' किरण टाकण्याचा प्रयत्न उत्तम कांबळे यांची कविता करते. म्हणूनच यशवंत मनोहर ''प्रश्नांच्या आगीतून करुणेच्या पौर्णिमेकडे धावणारी कविता' असे तिचे वर्णन करतात.

उत्तम कांबळे यांच्या जागतिकीकरणासंदर्भात कवितांचे पुढील विशेष सांगता येतील.

**कृषी जीवनातील घटितांचा वेध :**

गेल्या १०-१२ वर्षांपासून शेतकऱ्यांच्या वाढलेल्या

आत्महत्या हा चिंतनाचा विषय झालेला आहे. त्यांच्या आत्महत्येची कारणे कर्जबाजारीपण, चुकीचं जगण्याचं तंत्र, व्यसनाधीनता, पैशांची उधळपट्टी इ. सांगितली जातात. काही वेळा त्याच्या आत्महत्येला आत्महत्या म्हणता येत नाही. कारण आत्महत्येचे पेटंट घेण्यासाठी त्याने अर्जच केला नव्हता असे कारणही सांगितले जाते. राजकारण करणाऱ्या विरोधकांनी त्याच्या मरणाचा राजकारणासाठीच वापर करुन घेतला. पण आत्महत्येची मूळं कोणीच शोधू शकले नाही. कांबळे म्हणतात-

''त्यांच्या डेडबॉडीवर
कफनाऐवजी
राजकारण पांघरलंय''

जागतिकीकरणाच्या नावानं सुरू झालेल्या स्पर्धेचं हत्यार वापरून तो मारला जातोय.

कांबळे म्हणतात-

''बळीराजाला कधी कुणी
पावलाखाली गाडलं
कुणी व्याजाखाली गाडलं
तर कुणी त्याला
बाजारात पोहचण्यापूर्वीच मारलं''

त्यामुळे तो कर्जबाजारी झाला आहे. त्यानं हा बदललेला काळ समजून घेतला नाही. या स्पर्धेने त्याचे जीवन हराम बनवून टाकले आहे. एकीकडे कंपनी फार्मिंग, मोठमोठी सेझ, रद्दीच्या भावात होणारी जमिनीची विक्री, मेटाकुटीला आलेला सहकार असे चित्र दिसते. तर दुसरीकडे मुळातच थकबाकीदार असलेल्या बळीराजाला राष्ट्रीय बँका कर्जाचे दरवाजे बंद करतात अन् त्यामुळे व्याजाचे दर वाढवून कर्जाचे दरवाजे खुले करणाऱ्या सावकारांचे आयतेच फावले. परदेशी वस्तू आणि देशी वस्तू यांच्यात स्पर्धा सुरू झाली. उदा. साखर, चिकन, अत्याधुनिक औजारे विरुद्ध बैल इ. याशिवाय महागडी आणि बोगस बियाणी आली. देशी वाणाच्या अभावाने ती घेऊनही शेतीमालाचे भाव कोसळतच गेले. त्यामुळे हळूहळू त्याच्यासाठी लढणारे आवाज कसे क्षीण झाले आणि शेतकऱ्यांचे आक्रोश कसे मोठे झाले याचे वास्तव चित्रण कांबळे अत्यंत प्रत्ययकारी पद्धतीने करतात.

**जागतिकीकरणात गावांची झालेली वाताहत :-**

जागतिकीकरणामुळे सगळ्या गावाचं चित्र बदललंय, तेथील जमीन, साधनसामग्री पळविण्याचे प्रयोग झाले. तलावांचे, नद्यांचे खाजगीकरण झाले. उद्ध्वस्त गावाच्या मंदिरासमोर सुरू झालेल्या पोरांच्या खेळांविषयी कांबळे लिहितात.

''क्रिकेटचा खेळ भरात आलाय
बॅट म्हणून तुटलेले स्लिपर
स्टंप म्हणून दगडांची उतरंड
बॉल म्हणून चिंध्यांचा गोळा
मंदिराच्या पडक्या भिंतीवर
एक जाहिरात चमकतेय
उद्याच्या या खेळाडूंचे लक्ष वेधून घेतेय.
इट क्रिकेट
प्ले क्रिकेट
ड्रिंक कोकाकोला.''

हीच पोरंटोरं पुढे बेकार बनू लागली. रोजीरोटीच्या शोधात गाव सोडू लागली कारण इथं अभावाचीच गंगा सर्वत्र अवतरते. इथला गावातला सरपंच चावडीसमोर येऊन सरकारला शिव्या हासडतोय. कारण आरोग्य केंद्रात औषध नाही. अन् रस्त्यावर खडी नाही. रातच्या टायमाला दिवा नाही कारण काय तर म्हणे, 'सरकारी कल्याणकारी योजनांतून रिटायर होतंय', अशी ही खेड्यांची शासन पातळीवर होणारी उपेक्षा मन विषण्ण करते. कोरड्या पडलेल्या विहिरी अन् गावाचे खोल गेलेले डोळेच इथे दिसतात. नापिकी पाहण्याची क्षमता कोणातच उरलेली नाही. दहाबिघ्याचा पाटील आणि बिनबिघ्याचा भूमिहीन सारेच शहरातील फूटपाथवर दिसतात. उरतात फक्त म्हातारी कोतारी माणसं. कांबळे म्हणतात-

''मंदिराच्या ओसरीवर बसलेला
एक दमेकरी म्हातारा
आपल्या थरथरत्या ओठांवर
कसलंतरी एक गणित मांडतोय
पांढऱ्या केसांच्या भुवया उंचावत
पुटपुटतोय........
आमच्या पंचक्रोशीतीलं पाणी
टँकरमधनं नेत्यात
बाटलीत भरुन पाठवित्यात
दहाबारा रुपयाला एक बाटली?
या भावानं आम्हाला घ्या म्हणत्यात
बाटलीभर पाण्यात
एवढं पैकं असतील
हेच आम्हाला कंदी समजलंच नाही
म्हातारा कितीतरी वेळ पुटपुटत होता
ओठ थकले म्हणून
हाताची बोटं मोजत होता.''

थोड्यात म्हातारा संपतो पण हा हिशेब संपत नाही.

**शिक्षणाचे बाजारीकरण :**

गावातील हेच लंगोटीतले शेतकरी आपली जितराबं, जमिनी विकून मुलांसाठी डोनेशन भरतात कारण; मॉडर्न इंग्लिश स्कूलचा जन्मच डोनेशनसाठी आहे. परिणामी झेडपीच्या कुमार विद्यामंदिरात फक्त शिजवली जाते ती खिचडी. जे शिकले-सवरले त्यांना नोकऱ्या नसल्यामुळे ते सत्संगाला जातात. अन् शहराकडून गावाकडे आलेली हिप्पीबाज पोरं हृतिक रोशन बनून पोरींना पाणवठ्यावर अडवतात. काही जण डिगऱ्या दाखवून हुंड्याचा बाजार तेजीत आणतात. एकीकडे भरपूर मार्कांसाठी टयूशन अन दप्तरांचं ओझं वाहणारी ही पोरं मोठं झाल्यावर स्वत:च्या वाटेवरील धुकं दूर करण्यात यशस्वी होतील की नाही अशी शंकाही कांबळे व्यक्त करतात. कारण पदवी असूनही ग्लोबल भाषा ज्ञात नसेल तर ते नवनिरक्षर ठरतात. जागतिकीकरणाने ही नवनिरक्षरांची संख्या वाढलेली आहे.

**अस्वस्थ शहरात वैश्विक खेडी शोधण्याचा प्रयत्न :**

'शहराकडे चला' हा जागतिकीकरणाचा नारा शहरातलं वातावरणही गावासारखंच प्रदूषित करीत आहे. शहरातलं वातावरणही पूर्वीसारखं नाही. माणसांची मुंग्याप्रमाणं गर्दी आणि तीही भाषा, प्रांत, गरीब, श्रीमंत अशी विभागात चाललेली. त्यामुळे सारीच शहरं वेगवेगळ्या कारणांनी अस्वस्थ बनलेली आहे. यातही काही मंडळी वैश्विक खेडं शोधाताहेत. कांबळे लिहितात,

"पण हे वैश्विक खेडं सालं
भाकरीतल्या चंद्रासारखं
ते असून दिसत नाही
या अदृश्य खेड्यात जाण्यासाठी
धनवंतांची, बुध्दिवंतांची काय गर्दी
संगणक, क्रेडीटकार्ड, पासपोर्ट
फॉरेन करन्सी, इम्पोर्ट, पासपोर्ट, कोडवर्ड,
माऊस, साईट मोबाईल, ई-मेल, चार्टींग आणि
चिटिंगही."

मात्र या वैश्विक खेड्यात सारी पृथ्वीच भगभगत्या आगीचं चुलान झाली आहे आणि त्यात माणूस व माणूसकी खरपूस भाजली जात आहे. कांबळे म्हणतात.

"सारं जग जवळ आलंय म्हणतात
पण माणसं माणसापासून दूर धावताहेत
रोबोटच्या गळ्यात गळा घालताहेत
माणसाऐवजी यंत्रावर विश्वास टाकताहेत"

असे सगळे उलटेपालटे व्हायला लागले आहेत.

**मध्यमवर्गीयांची झालेली कोंडी :**

ज्या मध्यमवर्गीयाला स्वत:चं रूपांतर उच्च मध्यमवर्गीयांत करता आलं नाही त्याची अवस्था जागतिकीकरणात आणखी कठीण बनली. स्वत:ला प्रतिष्ठीत समजणारा हा वर्ग रडू व ओरडू शकत नाही. कारण तसे केले तर प्रतिष्ठा कमी होईल अशी वांझोटी भीती त्याला वाटत राहते. तो लढतही नाही अन् लढाईला पाठिंबा देत नाही. पण या नव्या फेऱ्यात तो भरडला जातोय हे नक्की.

कांबळे म्हणतात -

"कॅरिबॅगांमधून
प्रश्न वाहत नेताहेत
इथले लोक
दूधाच्या पिशव्यांप्रमाणे
अश्रूंच्या पिशव्याही
फ्रिजमध्ये ठेवताहेत लोक
प्लॅटमध्ये काळीज ठेऊन
रस्त्यावर फिरताहेत इथले लोक."

या गदारोळात आधुनिक मूल्यांचं असं वाटोळं व्हायला लागलंय. मात्र परिस्थिती इतकी बिकट असली तरी माणसाला चालावंच लागतं. प्रवास थांबवून भागत नाही.

**प्रसारमाध्यमे आणि माणूस यामधील भयग्रस्त लढाईचे चित्रण -**

संगणकामुळे जग जवळ आलं पण माणसं एकमेकांपासून दुरावली. माणसं एकत्र येण्यासाठी जवळ येण्यासाठी ती लढली नाहीत हे संगणक सांगतील. कारण जागतिकीकरणाच्या धबडग्यात माणसं आपली संवेदनशीलता गमावून बसली व फक्त देखाव्यासाठी, बाह्यगोष्टींसाठी लढत राहिली. कदाचित उद्या संगणक आणि माणसांत लढाई होईल. अन् माणसाचं अवमूल्यन होत राहील ही भयावह स्थिती मांडताना कांबळे म्हणतात-

"कुणी सांगावं
नव्या शतकातला माणूस
कदाचित
संगणकाच्या खांद्यावर मान ठेऊन
शेवटचा श्वास घेईल
दयाळू संगणक
अंतराळात
माणसाच्या थडग्याशेजारी शोकसभा घेतील."

विज्ञान गतीने चालेले आहे मात्र तेवढ्याच गतीने मूल्ये मागे मागे पडत आहेत किंवा हरत आहेत. हे सांगण्याचा प्रयत्न ते करतात.

यंत्राच्या सान्निध्यात माणूस यंत्र झाला व यंत्र मात्र माणसांसारखी वागू लागली. माणूस संगणकाला विचारतो,

"सेक्सपासून अध्यात्मापर्यंत

संस्कृतिपासून विकृतीपर्यंत
साऱ्याच गोष्टी
एकाच पोटात कसा काय ठेवून घेतोस?
संगणक म्हणाला,
मी फक्त तुझंच तर अनुकरण करतोय (पृ.७६)

हे त्याचं उत्तर कवीला भयावह वाटते आणि याहीपेक्षा अधिक भीती संगणक हा 'शंकराच्या पिंडीसारखा' पूजला जातो याची आहे. हा नवा धर्म उन्नतीकडे नेणारा नाही तर माहितीच्या विस्फोटात माणसाला बेचिराख करणारा आहे याची ही भीती आहे.

**स्त्रीयांची दुर्दशा मांडणारी कविता :**

स्त्रीचे वस्तूरूप झाले. कारण पुरुषीवृत्ती ही ग्राहकवृत्ती झाली. 'ती आणि तीची पिल्लं' यात त्यांचे चित्र कांबळे रेखाटतात.

''शेळ्यामेंढ्यांनी लेंड्या सांडाव्यात
त्याप्रमाणे पावलापावलावर ती
गर्भ सांडत निघाली
चौकातल्या कुटुंबनियोजनाच्या
पोस्टरशेजारी थांबून
तिनं मागं वळून पाहिलं तेंव्हा
पावला पावलावर
माणसांची पिल्लं उगवली होती.
अनं विचारू लागली
ये माय,
आमचा बाप कुठाय सांग
तिची खंडीभर पिल्लं निघाली दाही दिशांना
स्वत:साठी एक बाप शोधायला आणि माय निघाली
धसरड्या सस्त्यावरून
स्वत:साठी ग्राहक शोधायला.''

बाईचे झालेले बाजारीकरण, बाजारपेठांची वाढ, प्रलोभनांना बळी पडणं यातून मानवी मूल्यांची झालेली घसरण दिसते. ग्राहक हा जागतिकीकरणातील परवलीचा शब्द आहे. त्यामुळे स्त्री आणि पुरुष या दोघांचेही बाजारीकरण झालेले आहे. अशाही परिस्थितीत 'नातेसंबंध जपता यावेत' अशी या भोगवस्तू झालेल्या बाईंची मागणी आहे. ती म्हणते.

'अंधारा अंधारा ये ये
भाकरीचा घास दे दे
पोरांना बाप दे दे'. (पृ.४८)

नागरीकरणाच्या गोंडस नावाखाली बिल्डर लॉबीने उडवलेले तीनतेरा अन पुरात वाहत गेलेली शहरे याबद्दल कांबळे म्हणतात.

''कितवा हा महापूर
मृत्यू बनून येणार
तू हिशेब करीत होतीस माय
हातावरची बोटं मोजीत
डोळ्यातलं खारट पाणी पिणाऱ्या पावसाशी
हुज्जत घालत होतीस'' (पृ.११७)

यातील विलक्षण साम्य कांबळे अधोरेखित करतात. या कवितेविषयी ज्येष्ठ समीक्षक रा.ग.जाधव लिहितात की, ''उत्तम कांबळे यांची ही कविता कोणत्याही विचारप्रणालीच्या गवसणीत मावणार नाही. निव्वळ माणूसपण राबविण्यासाठी 'रेड अलर्ट' घोषित करणारी ही मुक्त संदेशवाहिनी आहे.'' कारण समकालीन मनुष्यकलहाचे केंद्र हे जागतिकीकरण आहे. मूलतत्त्ववाद, स्त्रीशोषण, दारिद्रय, नैसर्गिक आपत्ती, महाजालाचे अतिक्रमण, ग्रामजीवनातील नष्टचर्य या चक्रात येथला समाज कसा अडकून पडलेला आहे, हेच उत्तम कांबळे यांची कविता मांडत जाते.

**निष्कर्ष :**

१) माणसासह प्रत्येक गोष्टीचं क्रयवस्तूत रूपांतर झालं ही जागतिकीकरणाची काळी बाजू ही कविता मांडते.

२) विकृती विरुद्ध आवाज उठवताना ती माणसांचे महत्त्व सांगणाऱ्या बुद्ध, ख्रिस्त, मार्क्स, फुले, आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा आधार घेते.

३) एका समाजवादी आणि सेक्यूलर पहाटेचा नकाशा घेऊन मानवी समूहाला संस्कृतीच्या दिशेने ही कविता नेऊ पाहाते.

४) उत्तम कांबळे यांची कविता आजच्या वर्तमान वास्तवावर उत्तम व परखड भाष्य करते.

५) जागतिकीकरणाच्या काळात कवीतील 'स्व' ला तपासण्यासाठी, घासूनपुसून घेण्यासाठी ती जागृत करते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) कांबळे उत्तम, जागतिकीकरणात माझी कविता, सुगावा प्रकाशन, पुणे, २००६

२) जाधव रा.ग., ई सकाळ लेख-समकालीन मनुष्यकलहाची कविता, रविवार ४ जून २००६